| | |
|---|---|
| | दाखल तारीख – १०/१०/२०२२<br>नोंदणी तारीख – १०/१०/२०२२<br>निकाल तारीख – १२/१०/२०२३<br>कालावधी – ०१ वर्षे – ०० महिने – ०२ दिवस |

## भाग -अ

## कन्नड येथील न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग (न्यायालय क्र.३) यांचे न्यायालयात, ता. कन्नड, जि. औरंगाबाद

**(पिठासीन अधिकारी काटकर विजया एन.एस.)**

**समरी फौजदारी खटला क्र.१०४०/२०२२.**
**पिशोर पोलीस स्टेशन गुन्हा नं.III ३०२/२०२२.**
**निशाणी क्रमांक – १७/ब**

**महाराष्ट्र सरकार तर्फे**
**पोलीस स्टेशन पिशोर,**
**ता. कन्नड, जि. औरंगाबाद.** – **अभियोगपक्ष**

**उपस्थीती** **पी.आर.कुर्लेकर.**

**विरुध्द**

**प्रकाश भिकन मोकासे,**
वय ४६ वर्षे, धंदा – शेती,
रा. शफेपुर पिशोर, ता. कन्नड, जि. औरंगाबाद – **आरोपी**
**उपस्थीती :–** **विधीज्ञ एन.एम.शेख.**

## भाग – ब

| | |
|---|---|
| गुन्हा घडल्याची तारीख | दि.०२.०९.२०२२ |

| | |
|---|---|
| प्रथम खबरी अहवाल दाखल तारीख | दि.०२.०९.२०२२ |
| दोषारापपत्र दाखल तारीख | दि.२२.०९.२०२२ |
| पुरावा सुरु होण्याची तारीख | दि.१३.०४.२०२३ |
| न्यायनिर्णयसाठी राखीव ठेवण्याची तारीख | दि.१२.१०.२०२३ |
| न्यायनिर्णय | दि.१२.१०.२०२३ |
| शिक्षेबाबत तपशिल | आरोपीला निर्दोष सोडले. |

**आरोपीचे तपशिल.**

| अनु क्र. | आरोपीचे नाव | अटक केल्याची तारीख | जामीनावर सोडल्याची तारीख | कोणत्या गुन्हया अंतर्गत | दोषी अथवा निर्दोष | शिक्षे बाबत तपशिल | स्थानबद्दल वजावाट |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | प्रकाश भिकन मोकासे. | अटक नाही आरोपी आदेशिका जारी केल्यावर हजर. | दि १३.०४.२० २३. | महाराष्ट्र दारु प्रतिबंध कायदा १९४९, ६५ ई | निर्दोष | निरंक | निरंक |

**भाग–क**

**अभियोगपक्षातर्फे पुरावा**

| साक्षीदार क्र. | नाव | पुराव्याचे स्वरुप |
|---|---|---|
| १. | किरण बाबासाहेब गंडे. | फिर्यादी. |

**आरोपीतर्फे पुरावा – काही नाही.**

**अभियोगपक्षातर्फे अथवा आरोपीतर्फे दस्तऐवज.**

| अनु.क्र. | नि.क्र. | तपशिल. |
|---|---|---|
| १. | १२ | साक्षीदार क्र.१ |

| | | |
|---|---|---|
| २. | १३ | जप्ती पंचनाम्यावरील सही. |
| ३. | १४ | तक्रार. |
| ४. | १५ | जप्त मुद्देमाल पावती. |

**भाग –ड**

**मटेरिअल ऑब्जेट.**

| अनु.क्र. | मटेरिअल ऑब्जेट | तपशिल. |
|---|---|---|
| १. | देशी दारु. | देशी दारु संजीवनी संत्राच्या १८० एम.एल.च्या २४ बाटल्या. |

## न्यायनिर्णय

## (दिनांक १२/१०/२०२३ रोजी अधिघोषित )

आरोपी महाराष्ट्र दारु प्रतिबंधक कायदा, १९४९ चे कलम ६५ (ई) अन्वये दोषारोप संबंधीच्या संपरिक्षेस सामोरे जात आहे.

**अभियोग पक्षाची थोडक्यात हकीकत –**

**०२.** अभियोग पक्षाचे कथनाप्रमाणे, दि.०२/०९/२०२२ रोजी १६.०० वाजता फिर्यादी के.बी.गंडे, पो.ना. सोबत पो.कॉ. चव्हाण असे स.पो.नि. यांच्या आदेशाने अवैद्य माहीती काढुन केसेस कामी रवाना असताना त्यांच्या गुप्त बातमीदारामार्फत बातमी मिळाली की, शफेपुर येथे बाजारपट्टी शिवाजी चौक येथे एका टपरीत ईसम नामे प्रकाश भिकन मोकासे हा एका पिशवीत प्रोव्हीबीशन गुन्हयाचा माल देशी दारुची चोरटी विक्री करत आहे. अशी खात्रीलायक बातमी मिळाल्याने त्यांनी दोन पंचांना बोलावुन सदरची माहीती कळवुन त्यांना रेडचा उद्देश समजावुन सांगितला. पंचांना पंचनाम्या दरम्यान हजर राहणे बाबत कळविले असता त्यांनी पंच म्हणुन संमती दर्शविल्याने, मिळालेल्या माहीतीच्या ठिकाणी ते व सोबत असलेला स्टाफ व पंचासह सदर ठिकाणी १६.५० वाजता पोहचले असता सदर ठिकाणी एक ईसम उभा असल्याचे दिसला. सदर इसमास त्यांनी त्यांचा परिचय देऊन, रेडचा उद्देश समजावुन सांगुन, सदर इसमास त्याचे नाव गाव

विचारले असता त्याने त्याचे नाव प्रकाश भिकन मोकासे, रा. शफेपुर पिशोर, ता. कन्नड असे सांगितले. त्यानंतर पंचासमक्ष सदर इसमाजवळ असलेल्या पिशवीची झडती घेतली असता त्यामध्ये १८० एम.एल.च्या २४ काचेच्या बाटल्या ज्यावर देशी दारु संजीवनी संत्रा असे लेबल असलेले सिलबंद बाटल्या, एकुण किंमत २१६०/– रुपयाच्या मिळुन आल्या. त्यानंतर त्यांनी पंचनाम्यातील पंचासमक्ष सविस्तर पंचनामा करुन, सदर मुद्देमाल जप्त करुन, त्यावर त्यांच्या व पंचांच्या सहयांचे कागदी लेबल लावले. त्यापैकी एक बाटली वेगळी काढुन सिल लाख मोहर करुन सी.ए. तपासणीसाठी वेगळी राखुन ठेवुन, सदर मुद्देमाल पोलीस ठाण्यामध्ये नेण्यात आला. त्याप्रमाणे किरण बाबासाहेब गंडे, पो.ना., पोलीस ठाणे पिशोर, यांनी पोलीस स्टेशनला फिर्याद दिली व गुन्हयाचा पुढील तपास एस.ए.कांबळे, पो.हे.कॉ., पिशोर पोलीस ठाणे, यांनी गुन्हा रजि. नं.३०२/२०२२ अन्वये नोंद केली.

**०३.** सदर फिर्यादीप्रमाणे तपासी अंमलदार यांनी घटनास्थळाचा पंचनामा, जप्ती पंचनामा व आरोपीचा अटकेचा पंचनामा केला व तपासाच्या अनुषंगाने साक्षीदारांचे जबाब नोंदविले व सदर गुन्हयाचा तपास पुर्ण करुन महाराष्ट्र दारु प्रतिबंधक कायदा, १९४९ चे कलम ६५–ई अन्वये आरोपी विरुध्द दोषारोपपत्र दाखल केले.

**०४.** आरोपी विरुध्द **निशाणी क्र.११** वर महाराष्ट्र दारु प्रतिबंधक कायदा, १९४९ कलम ६५ (ई) नुसार गुन्हयाचा दोषारोप निश्चित केला. आरोपीने गुन्हा मान्य नसल्याचे सांगुन संपरिक्षेची मागणी केली.

**०५.** प्रस्तुत प्रकरणामध्ये अभियोग पक्षातर्फे एक साक्षीदार तपासण्यात आला. **निशाणी क्र. १/क** वर आदेशान्वये अभियोगपक्षाचा पुरावा बंद करण्यात आला. प्रस्तुत प्रकरणी आरोपीच्या विरुध्द विपरित पुरावा अभिलेखावर आल्यामुळे, त्यांचे फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ चे कलम **३१३ १–ब** अन्वयचे निवेदन नि.क्र.१६ वर नोंदवण्यात आले आहे. आरोपीने बचावामध्ये खोटी केस केल्याचे कथन केले आहे.

**विचाराधीन प्रश्न –**

**०६.** प्रस्तुत प्रकरणातील दोषारोप व अभिलेखावरील दाखल पुरावा व कागदपत्रे तसेच दोन्ही वकिलांचा युक्तीवाद यांचा विचार करता खालील विचाराधीन प्रश्न

उपस्थितीत होतात. सदर मुद्दयावरील निष्कर्ष खालीलप्रमाणे दिलेले आहेत.

| अ.क्र. | विचाराधीन प्रश्न | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | दि.०२/०९/२०२२ रोजी १६.५० वाजता, मौजे शफेपुर पिशोर बाजारपट्टी शिवाजी चौक, ता. कन्नड येथे आरोपीने विना परवाना बेकायदेशीर रित्या देशी दारु संजीवनी संत्राच्या १८० मि.ली.क्षमतेच्या काचेच्या एकुण २४ सिलबंद काचेच्या बॉटल, किंमत २१६०/– रुपयाच्या ताब्यात व कब्जात बाळगुन चोरटी विक्री करताना मिळुन आल्याचे अभियोग पक्ष शाबीत करतो काय? | नाही. |
| २. | काय आदेश ? | आरोपीची निर्दोष मुक्तता करणेत आली. |

## का र ण मि मां सा.

### विचाराधीन प्रश्न क्रमांक १ बाबत –

०७. प्रामुख्याने या ठिकाणी नमुद करावे लागेल की, आरोपीवरील दोषारोप शाबीत करणेसाठी अभियोग पक्षास, आरोपीने विना परवाना बेकायदेशीर रित्या देशी दारु संजीवनी संत्राच्या १८० मि.ली.क्षमतेच्या काचेच्या एकुण २४ सिलबंद काचेच्या बॉटल, किंमत २१६०/– रुपयाच्या ताब्यात व कब्जात बाळगुन चोरटी विक्री करताना मिळुन आला हा अंतर्भुत घटक सिध्द करावा लागेल.

०८. आरोपीवरील दोषारोप शाबीत करणेसाठी सरकार पक्षाने किरण बाबासाहेब गंडे (सा.क्र.१) यांची साक्ष **निशाणी क्र.१२** अन्वये नोंदविली आहे. सदर साक्षीदार यांनी त्यांचे सरतपासात असे सांगितले आहे की, दि.०२.०९.२०२२ रोजी ते पिशोर पोलीस ठाणे येथे कार्यरत होते. त्या दिवशी ते व पी.सी. चव्हाण असे १६.०० वाजता अवैध व्यवसायांची माहीती काढुन कार्यवाही करण्यासाठी पिशोर येथे रवाना झाले होते. त्यानंतर त्यांना अशी माहीती मिळाली की, बाजारपट्टी भागात एका टपरी जवळ प्रकाश मोकासे

नामक व्यक्ती अवैध रित्या दारुची विक्री करत आहे. त्यांनी पंचांना छाप्या संदर्भात माहीती देवुन त्यांची संमती घेवुन बोलावुन घेतले. त्यांनी पंचासह १६.५० वाजेच्या सुमारास घटनास्थळी छापा टाकला. तिथे एक इसम उभा होता व त्याच्या हातात पिशवी होती. त्याला त्याचे नाव गाव विचारले असता त्याने त्याचे नाव प्रकाश मोकासे असे सांगितले. त्या इसमाला त्यांनी त्यांचा परिचय देवुन त्याच्या सोबत असलेल्या पिशवीची झडती घेतली. त्या पिशवीमध्ये २४ बाटल्या देशी दारु संजीवनी संत्राच्या १८० एम.एल.च्या मिळुन आल्या. सदर मुद्देमाल जप्त करण्यात आला. जप्ती पंचनामा त्यांनी नि.क्र.१३ अन्वये तयार केला. त्यानंतर जप्त मुद्देमालातील एक बाटली रासायनिक विश्लेषणासाठी बाजुला काढण्यात आली व त्यावर कागदी लेबल चिटकवुन सिल करण्यात आली व त्यावर पंचांच्या सहया घेण्यात आल्या. त्यानंतर आरोपी व मुद्देमाल घेवुन पोलीस ठाण्यात आलो. आरोपीला त्यांनी फौ.प्र.सं. १९७३ अन्वये कलम ४१–ब ची नोटीस दिली व आरोपी विरुध्द त्यांनी तक्रार नि.क्र.१४ अन्वये दाखल केली. त्यानंतर जप्त मुद्देमाल मोहरील यांच्याकडे जमा करुन त्या संदर्भात मुद्देमाल पावती नि.क्र.१५ अन्वये फाडण्यात आली.

**०९.** साक्षीदार क्र.१ किरण गंडे यांनी नि.क्र.१३ वरील पंचनाम्याबाबत योग्य ती साक्ष दिली आहे व नि.क्र.१४ वरील तक्रार बाबत योग्य ती साक्ष दिली आहे. साक्षीदाराने पंचनामा व तक्रारीवरील सहया ओळखल्या आहेत. तसेच त्यातील मजकुराबाबतही साक्ष दिली आहे. सर्वात महत्वाचे साक्षीदाराला आरोपीने फिर्याद व पंचनाम्याबाबत कोणतेही विशेष सुचक प्रश्न विचारलेले नाही. त्यामुळे पंचनामा व फिर्याद शाबीत झाले आहे. तसेच साक्षीदाराने छाप्याच्या प्रक्रियेबद्दल योग्य ती साक्ष दिली आहे. त्यामुळे पोलीसांनी छापा टाकुन घटनास्थळी आरोपीची झडती घेवनु त्याच्याकडुन काही मुद्देमाल जप्त केल्याचे सिध्द होत आहे. उलटतपासादरम्यान साक्षीदाराने मान्य केले आहे की, छाप्याच्या दरम्यान आरोपी व त्याच्या सोबत असलेल्या सामानाची झडती घेण्याअगोदर पोलीसांना झडती देणे आवश्यक असते. पोलीसांनी झडती दिल्याबाबतचा उल्लेख या प्रकरणात कुठेही नाही. परंतु या बाबींमुळे साक्षीदाराच्या साक्षीवर कोणताही परिणाम होत नाही. उलटतपासामध्ये आरोपीने इतर कोणतेही प्रश्न साक्षीदाराला विचारले नाही.

**१०.** महाराष्ट्र मद्य प्रतिबंधक कायदा, १९४९ कलम ६५–ई अनुसार एखादया व्यक्तीने प्रतिबंधक असलेले पदार्थ विक्री किंवा खरेदी किंवा स्वतःजवळ बाळगले तर त्यास कमीतकमी तीन वर्षाची कारावासाची शिक्षा व रु.२५०००/– चा दंड तसेच कारावासाची शिक्षा ५ वर्षापर्यत देता येऊ शकते व दंड रक्कम रु.५०,०००/– जाऊ शकते. या आरोपाचा मुळ गाभा हे प्रतिबंधक पदार्थ असून आरोपीकडून जप्त केलेले मुद्देमाल हे प्रतिबंधक पदार्थ हे दारु असल्याचे अभियोग पक्षास सिध्द करणे अपेक्षीत आहे. आरोपीवरील दोषारोप सिध्द करणेसाठी अभियोग पक्षाने रासायनिक विश्लेषणाचा अहवाल याकामी सादर केलेला नाही. त्यामुळे आरोपीच्या ताब्यातुन देशी दारु संजीवनी संत्राच्या १८० मि.ली.क्षमतेच्या सिलबंद काचेच्या एकुण २४ सिलबंद बॉटल किंमत २१६०/– रुपयाच्या ताब्यात व कब्जात बाळगुन चोरटी विक्री करताना मिळुन आला हे सिध्द करीत नाही. तसेच, आरोपीविरुध्द लादण्यात आलेल्या आरोपांच्या सिध्दतेकरीता अभियोग पक्षाने **महाराष्ट्र मद्य प्रतिबंधक कायदा, १९४९ कलम ६५–ई** नुसार परवानाबाबत कोणतेही पुरावा याकामी दाखल केले नाही. त्यामुळे, आरोपीकडे दारु बाळगण्याचा परवाना नव्हता अगर परवाना होता पण परवाण्याच्या अटीं व शर्तींचे पालन न करुन आरोपीने गुन्हा केला आहे, याबाबत, अभिलेखावर अभियोग पक्षाने तसेच, तपासी अधिका–याने कोणतीही सुस्पष्टता ठेवली नाही.

**११.** अभियोग पक्षाने उपरोक्त सादर केलेल्या तोंडी व कागदोपत्री पुराव्याचे गुणदोषावर अवलोकन करण्यापूर्वी प्रामुख्याने नमुद करावे लागेल की, प्रचलित न्याय तत्त्व प्रणालीनुसार आरोपीचे अपराधाचे कृत्य संशयाच्या पलिकडे शाबीत करण्याची सर्वस्वी जबाबदारी ही अभियोग पक्षाची असते. सदरची जबाबदारी अभियोग पक्षाने बचावातील त्रुटी, विसंगती व खोटेपणाचा आधार न घेता सबळ विश्वासार्ह तोंडी व कागदोपत्री पुराव्याने निःसंशयपणे व निर्विवादपणे सिध्द करावयाचे असते. अभियोग पक्ष स्वतः ही जबाबदारी पार पाडत नाही, तो पर्यंत आरोपी हा कायद्याच्या कक्षेत निष्पाप समजला जातो. आरोपीच्या बचावातील कमकुवतपणाचा फायदा अभियोग पक्षास घेता येणार नाही. सदर कामी अभियोग पक्षाने आरोपी विरुध्द लादण्यात आलेले आरोप निःसंशयपणे वरील चर्चेप्रमाणे सिध्द केले नाहीत, त्यामुळे विचाराधीन प्रश्न **क्रमांक १ चे** उत्तर **नकारार्थी** देत आहे.

**विचाराधीन प्रश्न क्रमांक २ बाबत –**

१२. अभियोग पक्षास आरोपीने गुन्हा केलेचे सिध्द करता आलेले नाही. त्यामुळे आरोपी निर्दोष मुक्त होणेस पात्र आहे. सदर कामी जप्त केलेला मुद्देमाल म्हणजेच देशी दारु संजीवनी संत्राच्या १८० मि.ली.क्षमतेच्या काचेच्या एकुण २४ बाटल्या अपिल कालावधीनंतर विल्हेवाट लावणे आवश्यक आहे. सबब, **विचाराधीन प्रश्न क्रमांक २** चे उत्तराकरीता मी खालील आदेश पारीत करते.

**आदेश**

१. आरोपी **प्रकाश भिकन मोकासे** यांना फौजदारी प्रक्रिया संहिता कलम, २५५ (१) अन्वये महाराष्ट्र दारु प्रतिबंधक कायदा, १९४९ चे कलम ६५–ई अन्वये शिक्षापात्र असलेल्या अपराधातून निर्दोष मुक्तता करण्यात येत आहे.

२. आरोपीचा वैयक्तिक जातमुचलका व जामीनकतबा रद्द करण्यात येत आहे.

३. प्रस्तुत कामातील जप्त मुद्देमाल देशी दारु संजीवनी संत्राच्या १८० मि.ली.क्षमतेच्या काचेच्या एकुण २४ बॉटल हया अपीलाचा कालावधी संपल्यानंतर अधिक्षक, राज्य उत्पादन शुल्क, औरंगाबाद यांच्याकडे कायद्याप्रमाणे विल्हेवाट लावण्याकरीता पाठवाव्या.

४. प्रस्तुत कामातील मुद्देमाल पावतीमध्ये नमुद केल्याप्रमाणे जप्त मुद्देमाल देशी दारु संजीवनी संत्राच्या १८० मि.ली.क्षमतेच्या काचेच्या एकुण २४ रिकाम्या बॉटल(त्यातील द्रव्य ज्यास देशी दारु संजिवनी असे म्हणण्यात येत आहे) मुल्यहीन असल्यामुळे अपील कालावधीनंतर नियमाप्रमाणे विल्हेवाट लावण्यात यावी.

५. आरोपीने फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ कलम ४३७–अ प्रमाणे रक्कम रुपये १०,०००/– चा वैयक्तीक जात मुचलका सादर करावा.

६. आरोपीला इतर गुन्हयात आवश्यकता नसल्यास सोडण्यात येत आहे.

(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात जाहीर करणेत आला.)

Digitally signed by Vijaya Narayanrao Katkar
Date: 2023.10.13 11:55:42 +0530

दिनांक – १२/१०/२०२३.
कन्नड.

(काटकर विजया एन. एस )
प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,
(न्यायालय क्र.३) कन्नड.

**<u>प्रमाणपत्र</u>**

असे प्रमाणित करणेत येते की, पी.डी.एफ.निकालपत्र/आदेश यामधील सर्व मजकुर मुळ निकालपत्र/आदेशातील मजकुराप्रमाणे तंतोतंत खरा व बरोबर आहे.

लघुलेखकाचे नांव – के. जी. खैरे,

न्यायालयाचे नांव – २रे सह दिवाणी न्यायालय, (क.स्तर),
तथा प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी न्यायालय, कन्नड.

श्रुतलेखन दिल्याचा दिनांक – १२.१०.२०२३

न्यायिक अधिका–यांनी निकालपत्रावर
स्वाक्षरी केलेचा दिनांक – १२.१०.२०२३

निकालपत्र अपलोड केलेचा दिनांक – १३.१०.२०२३

..............................................................................